भा.पा. हिवाळे शिक्षण संस्था संचलित

ग्रामीण विकास अध्ययन केंद्र - समाजकार्य व संशोधन

संस्था अहमदनगर,

विषयाचे नाव

# Livelihood issues during pandemic

विद्यार्थ्याचे नाव

शिंदे शाहूल सोपान

MSW द्वितीय वर्ष

सी.एस.आर.डी.समाजकार्य महाविद्यालय अहमदनगर.

# क्षेत्रकार्य संस्था

## अहमदनगर महानगरपालिका




- नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय अंतर्गत,
- २००३ पासून अहमदनगर शहरासाठी कार्यरत.
- आयुक्त - मा. श्री. शंकर गोरे.

- या अंतर्गत विविध विभाग कार्यरत असून त्याद्वारे महानगरपालिकेचे कार्य चालते.



## ➢ दीनदयाळ अंत्योदय राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष



- हा विभाग दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान राबविण्याचे कार्य करत आहे.



- या विभागाद्वारे अहमदनगर शहरामध्ये विविध योजना राबविण्यात येतात.
- विभाग प्रमुख - मा. श्री. निलेश शिंदे

  मा. श्री. नानासाहेब बेल्हेकर

## ➢ सामाजिक अभिसरण व संथात्मक बांधणी

### ❖ SHG - स्वयं सहाय्य गट


- केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत नियुक्त केलेल्या विविध यंत्रणेमार्फत (अंगणवाडी सेविका आणि आशा) यांच्यामार्फत सदर गटाची स्थापना केली जाते.
- मुकुंदनगर परिसरातील किंवा समुदायातील बचतगट अध्यक्षा सौ. सीमा पांडूळे यांना भेटून त्यांच्या मार्फत १२ बचत गटांना मिळालेल्या फिरत्या निधी विषयी जाणून घेतले.




- १०००० रु. पर्यंतचा फिरता निधी राज्य अभियान संचालकांमार्फत उपलब्ध करून दिला जातो. या निधी विषयी समुद्यामधील बचत गटांना भेटी देऊन माहिती संकलित केली.
- जिल्हा अधिकारी यांच्या सोबत विविध बँकेच्या बचत गटांच्या विषयी असणाऱ्या मिटिंगमध्ये सहभागी होऊन बचत गटासाठी बँकांचे असणारे टार्गेट समजून घेतले आणि ते कशाप्रकारे पूर्ण केले जाते हे देखील समजून घेतले.

## ❖ कौशल्य विकास प्रशिक्षण

- महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) मार्फत मोफत प्रशिक्षण दिले जाते.
- नोंदणीकृत संस्थामध्ये व्यावसायिक प्रशिक्षणाची सोय उपलब्ध असते.
- ब्युटी पार्लर आणि फॅशन डिझाईन या कोर्स वरती प्रशिक्षण दिले जाते.




- प्रत्येक यशस्वी लाभार्थ्यास कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल आवशक ते पूर्णतत्वाचे प्रमाणपत्र दिले गेले.
- प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर नामांकित कंपन्यामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम केले.

## ❖ शहरी बेघरांना निवारा

- अहमदनगर महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष आणि सी.एस.आर.डी समाजकार्य महाविद्यालय यांच्या समन्वयाने चालविला जाणारा बेघर निवारा प्रकल्प या प्रकल्पामधील लाभार्थ्यांना त्यांची स्वतःची ओळख निर्माण करून देण्याचे कार्य केले.
- आधारकार्ड नसणाऱ्या आणि कोणत्याही प्रकारचे ओळखपत्र नसणाऱ्या लाभार्थ्यांची माहिती आणि त्यांची नावे घेतली.



- आधारकार्ड तयार करण्यासाठी लागणारे कागदपत्रे यांची माहिती आधार केंद्रामधून मिळविली.
- कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण केली.
- लाभार्थ्यांना आधार केंद्रावरती घेऊन येऊन त्यांची आधार कार्ड तयार करण्यासाठी लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण केली.
- बेघर निवारा प्रकल्पामधील लाभार्थ्यांना आधारकार्ड मिळवून दिले.

## ❖ PM स्व-निधी या योजने अंतर्गत पथविक्रीत्यांना (फेरीवाल्यांना) अर्थसहाय्य -




- नोंदणीकृत पथविक्रीत्यांचे ऑनलाइन सर्वेक्षण करण्यात आले.
- ४२२० पथविक्रीत्यांच्यापैकी २०१५ पथविक्रीत्यांना पीएम स्वनिधी अंतर्गत १५०० रु. शासनाकडून मदत मिळून देण्याचे कार्य करण्यात आले.
- या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्याचे काम केले.



- ज्या नोंदणीकृत पथविक्रीत्यांनी १०००० रु. कर्ज योजनेसाठी फॉर्म भरला होता अशा पथविक्रीत्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याचे काम केले.
- या योजनेचा लाभ मिळून देण्यासाठी प्रत्येक लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.
- पात्र लाभात्र्यांची माहिती शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवरती भरण्याचे काम केले.

❖ **कोरोना (कोविड-१९) संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य मिळून देणे.**

- अहमदनगर शहरातील समुदायांमध्ये जावून गृहभेटी घेऊन योजनेस पात्र लाभार्त्यांना योजनेची माहिती दिली.
- योजनेस पात्र लाभार्थ्यांची यादी तयार केली.
- योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी पात्र लाभार्थ्यांचे कागदपत्रे जमा करण्याचे काम केले.




- संगणकामध्ये लाभार्थ्यांची माहिती भरण्याचे काम केले.
- जिल्हा महिला व बाल कल्याण विभागाला लाभार्थ्यांची यादी पाठविली.




## ❖ रक्तदान शिबिर

- CSRD समाजकार्य महाविद्यालय आणि अहमदनगर महानगरपालिका संचालित कै. बाळासाहेब देशपांडे हास्पिटल अहमदनगर यांच्या संयुक्त विध्यमानाने आयोजित भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते
- यामध्ये १८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.









## ❖ इतर उपक्रम आणि कार्य

- केडगावयेथे लसीकरण शिबीर घेण्यात आले त्यामधून आरोग्य कर्मचाऱ्यांना मदत करून लस घेण्यासाठी आलेल्या लोकांना लासीकरणाचे फायदे सांगून जनजागृती करण्यात आली.
- अहमदनगर महानगरपालिकेच्या दिव्यांग विभागातील १२०० दिव्यांग व्यक्तींच्या मोफत लसीकरणासाठी प्रस्ताव तयार करून आरोग्य विभागाकडे देण्यात आला.
- पिंपळगाव पिसा या गावामधील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी रुग्णवाहिकेसाठी प्रस्ताव तयार करून तो अहमदनगर महानगरपालिकेमध्ये प्रस्तुत केला.
- पिंपळगाव पिसा या गावामधील बेगरहोममध्ये एच.आय.व्ही एड्स वरती कार्यक्रम घेतला.
- पिंपळगाव पिसा या गावामध्ये अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर यांच्या मदतीतून किशोरवयीन मुलींना मासिक पाळी विषयी लॉकडाऊन काळामध्ये आलेल्या समस्या जाणून घेऊन त्यांना सॅनिटेरीझ पॅडचे वाटप कण्यात आले.
- पिंपळगाव पिसा या गावामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी जंतुनाशक औषधाची फवारणी करण्यात आली.
- अंगणवाडी सेविकांच्या मदतीने पिंपळगाव पिसा या गावामध्ये ० ते ५ वयोगटातील मुलांना आणि गर्भवती महिलांना पोषक आहाराचे वाटप करण्यात आले.
- लॉकडाऊन काळामध्ये पिंपळगाव पिसा या गावातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## ❖ निरीक्षण

- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागामध्ये क्षेत्रकार्य करताना माझ्या निरीक्षनामध्ये असे आले कि, या विभागामध्ये प्रामुख्याने पाच घटकांवरती जास्त भर दिला गेला आहे.
- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागामध्ये क्षेत्रकार्य करत असताना या विभागामध्ये लोक योजनांविषयी असणाऱ्या आपल्या समस्या घेऊन येतात व त्या समस्या या विभागामधून सोडविण्याचे कार्य उत्तम प्रकारे केले जाते.
- समुदायामध्ये बऱ्याच ठिकाणी कोरोनामुळे जास्त करून कर्त्या व्यक्तीचाच मृत्यू झालेला असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले.
- समुदायामध्ये ठीक ठिकाणी लसीकरण उत्तम प्रकारे चालू असून लोकांचा प्रतिसाद देखील चांगला आहे.

## ❖ शिकण्यास मिळालेल्या बाबी -

- NULM विभागामध्ये विविध योजनांवरती काम करण्यास मिळाले.
- समुदायामधील लोकांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्यांचे निवारण करताना त्यांचे मन दुखविले जाणार नाही हे शिकण्यास मिळाले.
- कोणत्याही अडचणीच्या परिस्थितीमध्ये काम करण्याची क्षमता वाढली व त्यातून संवाद कौशल्य, समस्या निवारण कौशल्य, वेळेचे नियोजन, नेतृत्व कौशल्य, समजून घेण्याची क्षमता, वेळेवर अहवाल लेखन, या कौशाल्यांमध्ये वाढ झाली.
- अडचणीच्या काळामध्ये लोकांपर्यंत आर्थिक मदत पोहचविण्याचे कार्य करण्यास शिकलो.

## ❖ क्षेत्रकार्यादरम्यान आलेली आव्हाने

- NULM विभागांतर्गत प्रथमच प्रशासकीय कार्य करत असल्याने वातावरणाशी जुळवून घेण्याची समस्या जाणवली.
- कोरोनामुळे सगळीकडे रुग्ण वाढत असल्याने गृहभेटी घेणे खूप जोखमीचे वाटले.
- समुदायातील लोकांना योजनेची माहिती देण्याअगोदर स्वतःचा परिचय करून देणे आणि त्यांना विश्वासात घेणे खूप अवघड जात असे.
- समुदायातील लोकांच्या समस्या सोडविताना त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पाहून त्यांना शांत करणे आणि सहनुभूती देणे एक आव्हानच होते.
- बेगर निवारा केंद्रातील लोकांना त्यांची ओळख निर्माण करून देण्यासाठी त्यांचे नवीन आधारकार्ड तयार करण्यासाठीची प्रक्रिया खूप अवघड असल्याने त्यामध्ये खूप अडचणी आल्या आणि हेच एक माझ्यासाठी खूप मोठे आव्हान होते.

# धन्यवाद